# मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जळगाव
## यांचे कार्यालय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्रमांक :- ०२५७-२२२३११४ Email - ceozpjal@yahoo.com

परिपत्रक :-

जा.क्र.मु.का.अ./स्विस/आरआर/८३/२०२३
दिनांक :- २८/०४/२०२३

प्रति,
१) खाते प्रमुख सर्व
जिल्हा परिषद जळगांव
२) गट विकास अधिकारी
पंचायत समिती सर्व

माझे असे निदर्शनास आले आहे की, खाते प्रमुख, गट विकास अधिकारी तसेच तालुकास्तरीय अधिकारी/कर्मचारी यांची जिल्हास्तरावर नियमित आढावा सभा घेण्यात येते. सदर आढावा सभा घेतांना संबंधित विभाग / कार्यालया मार्फत सुरु असलेल्या योजना / प्रकल्प / कार्यालयीन कामकाज यामध्ये समाधानकारक प्रगती झाल्याचे दिसुन येत नाही. यावरुन संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख हे त्यांचे अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांची योजनानिहाय/कामकाजा बाबत पाठपुरावा/आढावा सभा घेत नसल्याचे दिसुन येते. आपणास यापुर्वी देखिल जिल्हास्तरीय आढावा सभेमध्ये वारंवार कामकाजा बाबत सभा घेण्याचे निर्देशित केलेले आहे.

त्याअनुषंगाने आपणास याव्दारे आदेशित करण्यात येते की, जिल्हा व तालुकास्तरवरील प्रत्येक खाते प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी त्यांचे अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांची केंद्र/राज्य/जिल्हास्तरीय योजना, ध्वजांकित कार्यक्रम (फ्लॅगशिप प्रोग्राम), जिल्हा नियोजन समिती अंतर्गत कामे, कार्यालयीन कामकाज, प्रलंबित प्रकरणे, आस्थापना तसेच लेखा विषयक बाबी, ऐ.टि.आर., के.आर.ए. प्रमाणे कामकाज, भेटी/तपासणी, व इतर अधिनस्त योजना/कामकाजाचा प्रत्येक आठवड्यातुन एकदा आढावा घेण्यात यावा. जिल्हा मुख्यालयातील विभाग प्रमुख यांनी विभागातील कर्मचाऱ्यांचा ऑफलाईन व तालुकास्तरीय यंत्रणेचा प्रत्येक आठवड्यातुन एकदा ऑनलाईन आढावा घेण्यात यावा. सदर आढावा सभेचे इतिवृत्त तयार करुन सदर इतिवृत्ताची एक प्रत जिल्हास्तरीय आढावा सभेला येतांना समक्ष सादर करावी.

सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत दक्षता घ्यावी.

डॉ.पंकज आशिया (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, जळगाव

प्रत :- अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगांव यांना पुढील कार्यवाहीस्तव.

D:\ceo letters-2023.docx

Scanned with OKEN Scanner